# प्रेसनोट दि. २९/०३/२०१९

## देशी बनावटीचे एक पिस्टल व एक काडतुस बाळगणाऱ्या एक सराईत गुन्हेगारास गुन्हे शाखा, युनिट १ च्या टिमने केली अटक

पुणे शहरामध्ये गुन्हेगार चेकींग व लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने वरीष्ठ अधिकारी यांनी पुणे शहरामधील रेकार्डवरील आरोपीच्या हालचालीवर पाळत ठेवण्याचे आदेश दिले होते. त्याअनुषंगाने गुन्हे शाखा युनिट १ च्या हद्दीत खाजगी वाहनाने पेट्रोलींग करीत असतांना पोलीस नाईक सचिन जाधव यांना त्यांचे बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, एका इसमाकडे एक पिस्टल व काडतुस असुन ते घेवुन तो एम.एस.ई.बी. ऑफिस जवळील शशिकांत दुध डेअरी जवळ, रास्ता पेठ पुणे येथे सार्वजणीक रोडलगत अग्नीशस्त्र घेवून आल्याबाबतची खात्रीशिरपणे बातमी मिळाली. सदरची बातमी युनिट १ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरुण वायकर यांना कळविली असता, त्यांनी लागलीच कायदेशीर कारवाई करणेबाबत आदेश दिले.

लागलीच युनिट १ कडील पोलीस उप-निरीक्षक बुदगुडे व स्टाफ यांनी सदर ठिकाणी जावून वरील स्टाफच्य मदतीने शिताफिने छापा टाकून बातमी प्रमाणे एका इसमांस ताब्यात घेतले. त्यास त्याचे नांव पत्ता विचारता त्याने आपले नांव पत्ता शकंर उर्फ बाबु कैलास पंदेकर वय २२ वर्षे, रा. २/१५/१२ व्ही.आय.टी.कॉलेज जवळ, अप्पर इंदीरानगर,पुणे असे असलेचे सांगीतले. त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे पॅन्टचे कंबरेला एक देशी बनावटीचा पिस्टल मॅगझीनसह मिळुण आला तसेच त्याचे पॅन्टचे खिशामध्ये एक जिवंत काडतुस मिळुण आला, त्याकडे अधिक चौकशी करता त्याने घातक शस्त्रे अनाधिकाराने बेकायदेशीर रित्या विनापरवाना, जवळ बाळगल्याने त्याची पंचासमक्ष अंगझडती घेतली असता, त्याचे कब्जातील एक देशी बनावटीचे लोखंडी पिस्टल व एक जिवंत काडतुसे असा एकुण किं.रु. ३५,२००/- रु किमंतीचा माल जप्त करण्यात आला असुन, **सदर आरोपी हा रेकॉर्डवरील गुन्हेगार असुन, त्यावर वेग-वेगळ्या पो.स्टे. मध्ये एकुण २२ गुन्हे दाखल आहे.**

सदरची कारवाई ही श्री. प्रदीप देशपांडे सो. अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री. शिरीष सरदेशपांडे सो. पोलीस उप आयुक्त, गुन्हे. श्री समिर शेख सो. सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे-१ यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. अरुण वायकर, पो उप निरी. बुदगुडे, पो.हवा.योगेश जगताप,संजय बरकडे, बाबा चव्हाण,पो.ना. सचिन जाधव, पो.शि.गजानन सोनुने, तुषार माळवदकर, यांनी केली आहे.